भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ५४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०७/२०१७

**१) संगनमत करून लोखंडी सलाखीने गुडग्यावर व लोखंडी टिकासने डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१२ चे २१.०० वा दर. यातील फिर्यादी जगदिश वासुदेव शिंदे वय ३६ वर्ष रा. रामपुरी यांचा पुतण्या पवन मंगेश शिंदे वय ०६ महीने हा घरी प्रकुती बरी नसल्याने जोराने रडत असल्यामुळे फिर्यादी हा आपल्या घरी जोराने बडबड करीत होता, तेव्हा आरोपीतांनी आपले अंगावर घेवुन फिर्यादीच्या उजव्या पायाचे गुडग्यावर लोखंडी सलाखीने मारले व भावु मंगेश वासुदेव शिंदे वय २५ वर्ष याला लोखंडी टिकासने डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पो. स्टे पांलादुर येथे कलम ३०७,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. सुनगार पो.स्टे. पांलादुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करून सार्वजनीक ठिकाणी महीलांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे १७.०० ते १९.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी ही घराजवळील काम करित असलेल्या एसबीआय बॅक शाखा चिखला येथे काम करीत असता यातील आरोपी क्र. ०१ हा तेथे येवुन फिर्यादीची बहीन हीला बॅक मधुन मला आधी पैसे काढु दया नंतर काम करा असे म्हटले असता फिर्यादीने आरोपीतांना रांगेत या बॅकेत गर्दी आहे असे म्हणाली असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीने सार्वजनिक ठिकाणी अश्लिल शब्दात शिवीगाळ करून आरोपी क्र.०२ ने फिर्यादीची ओढनी ओढुन विनयभंग केल्याने व फिर्यादीची आई हिला ढकलढुकल करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २९४,३५४,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे दिवसा. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ९ महिने हिला आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार पंपची चोरी. :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे १९.३० वा. ते दिनांक २९/०७/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी मंसक शामजी माकडीया वय ५९ वर्ष, रा. गोवर्धन नगर तुमसर यांचे वैनगंगा नदी काठावर लावलेली सबमर्शिल मोटार पंप किंमती ८,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बोन्द्रे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**५) अज्ञात मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील फिर्यादीचा पती सौ. आलीया सोहब पठाण वय २८ वर्ष, रा. वार्ड नबंर ०४ महिला समाज शाळेच्या मागे भंडारा हिचा पती जखमी सोहेब पठाण वय ३२ वर्ष, हा औषधी आणण्याकरीता त्याचे दुचाकी वाहणाने जात असता समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला आमोरा समोर धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे तुमसर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून १० लिटर हा.भ. दारू+ १२० किलो सडवा मोहफुल किंमती १२,६००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.